# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## राज्यस्तरीय विशेष शिबीर

### आयोजक

श्री. दुर्गा शिक्षण संस्था व्दारा संचालित

## शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय अर्जुनी/मोर. जि. गोंदिया

**(नॅकद्वारा 'बी' ग्रेड मानांकित)**

**दिनांक: १३ फेब्रुवारी २०२३ ते १९ फेब्रुवारी २०२३**

**शिबीर स्थळ : जिल्हा परीषद वरीष्ठ प्राथमिक शाळा निमगाव ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया**

---

पत्र क्र./ दिनांक : १४/०१/२०२३

प्रति,

मा.संचालक, राष्ट्रीय सेवा योजना,

................................................

................................................

विषय : राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबीरात आपल्या विद्यापीठातील स्वयंसेवक/स्वयंसेविका व कार्यक्रम अधिकारी पाठविण्याबाबत

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात आनंद होत आहे की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर व्दारा संग्लनीत शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय अर्जुनी/मोर. च्या वतीने **'राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबीर'** दिनांक १३ फेब्रुवारी २०२३ ते १९ फेब्रुवारी २०२३ या दरम्यान मौजा: निमगाव, ता. अर्जुनी/मोर., जि. गोंदिया येथे आयोजित करण्यात आले आहे. आपणास विनंती आहे की, आपल्या विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना पथकातील ०५ स्वयंसेवक, ०५ स्वयंसेविका व ०१ कार्यक्रम अधिकारी शिबिरात सहभागी होण्याकरिता पाठवावे. याकरिता हे आग्रहाचे निमंत्रण!

शिबीराचा तपशिल, सुचना व नियम या पत्रासोबत जोडलेले आहेत. निवड झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये जोखीमपत्रासह पाठवावी. जोखीमपत्र आणि ओळखपत्र याशिवाय आलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार नाही, ही बाब निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश उत्तम नागरिक घडविणे असल्यामुळे शिबीरात सामील झालेल्या विद्यार्थ्यांना शिस्तीचे पालन करणे आवश्यक आहे. सहभागी होणाऱ्या शिबीरार्थ्यांच्या नावाची नोंदणी दि. ४ फेब्रुवारी २०२३ पर्यंत सोबत दिलेल्या गुगल फॉर्मच्या ऑनलाईन लिंकवर करावी. आपण आमच्या विनंतीचा सहृदयतेने विचार कराल हीच अपेक्षा.

धन्यवाद !

**आपले विनित**

**डॉ. सोपानदेव पिसे**
संचालक, रा.से.यो.
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**डॉ. मोतीलाल दर्वे**
शिबीर प्रमुख तथा
रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी

**प्रा. प्रविण चंद्रगिरीवार**
रा.से.यो. जिल्हा समन्वयक
जिल्हा गोंदिया

**डॉ. ईश्वर मोहुर्ले**
प्राचार्य, शिवप्रसाद सदानंद जायस्वाल
महाविद्यालय अर्जुनी/मोर. जि. गोंदिया

**डॉ. प्रदीप भानसे**
शिबीर सहप्रमुख तथा
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी

**प्रा. कैलास लोखंडे**
शिबीर सहप्रमुख तथा
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी

**डॉ. भारत राठोड**
माजी रा.से.यो. समन्वयक
जिल्हा गोंदिया

**प्रा. राजेश डोंगरवार**
रा.से.यो. सहकार्यक्रम अधिकारी

**प्रतिलीपी सादर–**

१) मा. कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

२) मा. राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी रा.से.यो.
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालयीन कक्ष, महाराष्ट्र शासन, एलफिन्स्टन महाविद्यालय परिसर बोरीवली, मुंबई.

३) मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**सहपत्रे** : १) शिबीराचा तपशिल, सुचना, नियम २) जोखिमपत्र. ३) Medical Certificate ४) Volunteer Slip Certificate

# शिबिराचा तपशिल

**१) शिबीराचे स्थळ :** जिल्हा परीषद वरीष्ठ प्राथमिक शाळा निमगाव ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया

**२) शिबीराचा कालावधी :** दिनांक १३ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी २०२३

**३) शिबीरात पोहोचण्याचा दिवस व वेळ :** सर्व शिबिरार्थ्यांनी दिनांक १३ फेब्रुवारी २०२३ दुपारी २:०० वाजता पर्यंत शिबीर स्थळी पोहोचणे आवश्यक आहे. किंवा शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, अर्जुनी रेल्वे स्टेशनजवळ, अर्जुनी/मोर. जि. गोंदिया येथे दुपारी १.०० वाजेपर्यंत पोहोचावे. महाविद्यालयामधून शिबाराथ्यांना शिबीर स्थळी पोहोचण्यासाठी योग्य ती व्यवस्था करण्यात येईल.

**४) निवास व भोजन व्यवस्था :** सर्व विद्यार्थ्यांची निवास व भोजनाची व्यवस्था आयोजकांतर्फे करण्यात येईल.

**५) ओळखपत्र :** विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यानी दिलेले अधिकृत ओळखपत्र व पत्रे सोबत आणावीत त्याशिवाय शिबीरात प्रवेश मिळणार नाही.

**६) प्रवासखर्च :** शिबीरार्थ्यांचा प्रवास खर्च संबंधीत महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित अनुदानातून करावा.

**७) शिबीरातील प्रकल्प: १**) परिसर स्वच्छता २) श्रम संस्कार ३) अंधश्रध्दा निर्मुलन ४) व्यसनमुक्ती ५) मतदार जनजागृती

६) महीला सबलीकरण ७) जलसंवर्धन ८) पर्यावरण संवर्धन ९) व्यक्तीमत्व विकास १०) आरोग्य व पर्यावरण

**८) शिबीराची दिनचर्या :**

| | | | |
|---|---|---|---|
| पहाटे | : | ५.०० वाजता | —जागर |
| सकाळी | : | ६.०० ते ७.१५ | — प्रार्थना, व्यायाम व प्राणायाम |
| सकाळी | : | ७.१५ ते ८.०० | — नास्ता व चहा |
| सकाळी | : | ८:०० ते १२.०० | — श्रमदान |
| दुपारी | : | १२:०० ते २.०० | — आंघोळ, भोजन व विश्रांती |
| दुपारी | : | २.०० ते ४.३० | — बौद्धिक सत्र |
| दुपारी | : | ४.३० ते ५.३० | — बौद्धिक स्पर्धा, विविध खेळ व चहा |
| सायं. | : | ५.३० ते ६.३० | — सांस्कृतिक कार्यक्रम पूर्वतयारी |
| सायं. | : | ६.३० ते ७.०० | — हजेरी, आढावा बैठक व प्रार्थना |
| रात्री | : | ७.०० ते ८.०० | — भोजन |
| रात्री | : | ८.०० ते १०.०० | — सांस्कृतिक कार्यक्रम |
| रात्री | : | १०.०० वाजता | — विश्रांती |

**९) सांस्कृतिक कार्यक्रम :** शिबिरात सादर करण्यात येणारे सांस्कृतिक कार्यक्रम रा.से.यो. च्या उपक्रमांना साजेसे असावेत. लोकप्रबोधन व जनजागृती हे उद्दिष्टे असलेल्या कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात येईल, कार्यक्रमासाठी आवश्यक साहित्य शिबिरार्थ्यांनी सोबत आणावेत.

**११**) प्रत्येक शिबिरार्थ्याला प्रत्येक कार्यक्रमात सहभागी व्हावे लागेल

**११**) **सोबत आणावयाचे साहित्य :** पुरेसा बिछाना, स्पोर्ट शूज, डायरी, रा.से.यो. चे बॅच, पाण्याची बॉटली, साबुन, टुथपेस्ट, ब्रश, तेल, कंगवा, आरसा, आवश्यक असलेली औषधे, इत्यादी सर्व साहीत्य सोबत आणावेत.

**१२) शिबीराच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी** : निमगाव हे गाव राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वरील साकोली या ठिकाणापासून साकोली ते अर्जुनी/मोर. या रस्त्यावर साकोलीपासून ३४ किमी. अंतरावर आहे. साकोलीवरुन दर तासाला अर्जुनी/मोर. साठी महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळाच्या बसेस आहेत. रेल्वेने येणाऱ्या शिबीरार्थ्यांना चांदाफोर्ट ते गोंदिया रेल्वेमार्गावरील अर्जुनी रेल्वेस्थानकावर उतरुन महाविद्यालयात दुपारी १.०० वाजेपर्यंत पोहोचावे. महाविद्यालयातून शिबीर स्थळी जाण्याची व्यवस्था केली आहे. निमगाव हे ठिकाण अर्जुनी/मोर. ते साकोली या रस्त्यावर अर्जुनी/मोर. पासून ६ कि.मी. अंतरावर आहे.

# शिबीराची नियमावली

१) शिबीरार्थ्याने आपले ओळखपत्र महाविद्यालयाच्या प्राचार्याने दिलेल्या अधिकृत पत्रासोबत आणावे.

२) शिबीरार्थी आपल्या पालकांच्या व महाविद्यालयाच्या संमतीने शिबिरात सहभागी होत आहे असे गृहीत धरून शिबिरात कोणत्याही कारणांनी एखादा अपघात किंवा दुखापत झाल्यास आयोजकांना नुकसान भरपाई मागता येणार नाही.

३) शिबीरात एकदा दाखल झाल्यानंतर शिबीर सोडून आपल्या मर्जीप्रमाणे गावामध्ये व अन्य ठिकाणी जाता येणार नाही.

४) शिबीराच्या संपुर्ण कालावधीमध्ये शिस्त पाळावी. बेशिस्तपणा आढळल्यास संबंधीत विद्यार्थ्यावर उचीत कारवाई करून परत पाठविण्यात येईल व तशी सुचना संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांना व विद्यापीठाच्या संचालकांना देण्यात येईल.

५) राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर सहजीवन शिबीर असुन आपल्यामुळे सोबत राहणाऱ्या इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. परस्पराबद्दल अनुचित व असभ्य शब्दाचा वापर करू नये.

७) शिबीर परीसरात मादक पदार्थाचे सेवन करता येणार नाही.

८) शिबीरार्थ्यांनी विद्यापीठाचे व महाविद्यालयाचे बॅनर व ध्वज सोबत आणावे.

९) शिबीरार्थ्याने सोबत महागड्या वस्तू आणू नये. उदा. मोबाईल, सोन्याचे दागीणे इत्यादी.

१०) कोरोना लसिचे दोन्ही डोज घेतल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

**११) नाव नोंदणीसाठी ऑनलाईन लिंक : दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ पर्यंत खालील दिलेल्या लिंकवर नाव नोंदणी करावी.**
https://forms.gle/ZBW7LXWdxZZ33xDK6

**शिबीरा संदर्भात अधिक माहितीसाठी फोन नंबर:**

डॉ. मोतीलाल दर्वे, शिबीर प्रमुख व रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी : ९६८९२८०७५८

डॉ. प्रदीप भानसे, शिबीर सहप्रमुख व रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी : ७०२०४४१८७४

प्रा. कैलास लोखंडे, शिबीर सहप्रमुख व रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी : ९६७३२१६२७४

डॉ.भारत राठोड, रा.से.यो. सहकार्यक्रम अधिकारी : ९४०४२१८०२७

प्रा. राजेश डोंगरवार, रा.से.यो. सहकार्यक्रम अधिकारी ९४२३३८३८८४

महाविद्यालय कार्यालय : ०७१९६ २२०१५८ **मेल आयडी** :: ssjcnss1991@gmail.com

**आपले विनित**

**डॉ. सोपानदेव पिसे**
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर
(मो. ९९७०३६१४१८)

**डॉ. मोतीलाल दर्वे**
शिबीरप्रमुख, विभागीय समन्वयक
तथा रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
(मो. ९६८९२८०७५८)

**डॉ. ईश्वर मोहुर्ले**
प्राचार्य, शिवप्रसाद सदानंद जायस्वाल
महाविद्यालय, अर्जुनी/मोर. जि. गोंदिया
(फोन कार्या. ०७१९६–२२०१५८)

**प्रा. प्रविण चंद्रगिरीवार**
रा.से.यो. समन्वयक,
जिल्हा गोंदिया
(मो.९४०३८६७२१९)

**डॉ. प्रदीप भानसे**
शिबीर सहप्रमुख तथा
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
(मो. ७०२०४४१८७४)

**प्रा. कैलास लोखंडे**
शिबीर सहप्रमुख तथा
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
(मो. ९६७३२१६२७४)

**डॉ. भारत राठोड**
रा.से.यो. माजी समन्वयक, जिल्हा गोंदिया
(मो.९४०४२१८०२७)

**प्रा. राजेश डोंगरवार**
रा.से.यो. सहकार्यक्रम अधिकारी
(मो. ९४२३३८३८८४)

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

# राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबीर २०२३

(दिनांक १३ ते १९ फेब्रुवारी २०२३)

## शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय अर्जुनी/मोर. जि. गोंदिया

## नोंदणी फॉर्म (Registration Form)

फोटो

१. स्वयंसेवकाचे नाव :-----------------------------------------------------------------

२. महाविद्यालयाचे नाव :-------------------------------------------------------------

३. वर्ग :-----------------------------------------------------------------------

४. जन्मतारीख :------------------------------------------------------------------

५. रक्तगट :-----------------------------------------------------------------------

६. कायम वास्तव्याचा पत्ता :------------------------------------------------------
:------------------------------------------------------------------

७. मोबाईल नंबर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

८. ई-मेल आयडी ----------------------------------------------------------------

९. यापूर्वी सहभागी झालेल्या शिबिरांची संख्या :------------------

१०. विशेष कौशल्य : -------------------------------------------------------------

११. आवडीचे क्षेत्र : -------------------------------------------------------------------

१२. अभिप्राय : --------------------------------------------------------------------------

रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
स्वाक्षरी व शिक्का

रा.से.यो. स्वयंसेवक
स्वाक्षरी

प्राचार्य
स्वाक्षरी व शिक्का

------------------------------------------------------------------------------------

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
# शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय अर्जुनी/मोर. जि. गोंदिया
# राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबीर

(मौजा निमगाव, दिनांक १३ ते १९ फेब्रुवारी २०२३)

## जोखीमपत्र

माझ्या विनंती वरून माझे नाव दाखल झाल्यामुळे कुठल्याही प्रकारचे शिबीर/सत्र/रासेयोअंतर्गत येणारे साहस प्रशिक्षण उपक्रम व प्रवास अनुभवत असतांना, मी जबाबदारीपूर्वक असे स्विकार करतो/करते की, प्रशिक्षण काळात कुठल्याही शिबीरात/सत्र/रासेयोअंतर्गत येणारे साहस प्रशिक्षण उपक्रम व प्रवास यामध्ये कुठल्याही प्रकारची हानी वा मालमत्तेचे नुकसान वा व्यक्तीला झालेले नुकसान (नुकसानीमुळे मृत्यू झाल्यास) ह्यासंदर्भात मी अथवा माझे व्यवस्थापक/प्रशासक भारत सरकारच्या विरोधात किंवा कुठल्याही रासेयो अधिकाऱ्यांच्या विरोधात/प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी/कार्यक्रम समन्वयक/राज्यसंपर्क अधिकारी/युवा अधिकारी/सहाय्यक कार्यक्रम सल्लागार/सहकार्य क्रम सल्लागार यांच्या विरोधात कुठल्याही प्रकारचा दावा करणार नाहीत. आणि अशी कुठलीही हानी किंवा नुकसान (नुकसानीमुळे मृत्यु झाल्यास) झाल्यास भारत सरकार वा वर निर्देशीत केलेल्या कुठलाही अधिकारी यावर नुकसान भरपाई देण्याचे दायित्व राहणार नाही असे मी समजतो/समजते.

मी असे स्विकार करतो/करते की मी, माझे व्यवस्थापक व प्रशासक हे भारत सरकार वा कुठल्याही रासेयो अधिकारी वा भारत सरकारच्या सेवेतील कोणतीही व्यक्ती यांवर कोणताही दावा करणार नाही, तृतीय पक्षकार म्हणून त्यांच्या विरोधात जाणार नाही किंवा वर निर्देशीत प्रशिक्षण शिबीर/सत्र/रासेयो शिबीर /प्रजासत्ताक दिन संचालन /साहस प्रशिक्षण शिबीर व रस्ता/रेल्वे/समुद्र/नदी व विमानप्रवास या संदर्भात माझ्या हलगर्जीपणाच्या कुठल्याही वृत्तीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत विरोधात जाणार नाही.

----------------------

स्वयंसेवकाची सही

साक्षीदाराचे नाव १) ---------------------------------- सही----------------

२) ---------------------------------- सही----------------

माझा पाल्य हा/ही माझ्या संमतीने राष्ट्रीय सेवा योजना पथक शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय अर्जुनी/मोर. जि. गोंदिया यांच्या वतीने आयोजित रासेयो राज्यस्तरीय शिबीरात सहभागी होत आहे.

स्थळ :

दिनांक :

------------------------

पालकाची सही

# Certificate of Medical and Physical Fitness

Signature of the Candidate……………………………………………………………………..
That I have examined S/O D/O…………………………………………………………………...
Do here certify Mr./Mrs. ……………………………………………………………….…..
……………………………………………………………………and found it fit for undergoing rigorous training for National Camp/Pre-Republic day Camp/Adventure camp/<u>NSS State level Camp.</u>

The candidate whose signature is given above is not suffering from any communicable or chronic disease, which may cause any hindrance in his/her participation in the above mentioned rigorous training programme.

Place :……………………..
Date :……………………..

**Signature of the Medical Officer**
**Name with seal**

# Volunteer Slip Certificate

It is certified that Shri/Ku.…………………………………………………..…………Son / Daughter of Shri…………………………………………………………………..is a bonafide student of (Name of Institution)…………………………………………………………..……………….

He/She is a regular NSS volunteer from…………………………and has completed his/her one year of volunteership and he/she is neither a member of NCC nor a member of Scouts and Guides/Rovers/Rangers.

He has attended NSS Special camp from…………..………..to…………..……….(Date) At……………………………………………………………………..…………..(Venue)

**Signature of the Programme officer with Seal** **Signature of the Principal with Seal**